# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**विषय : पीएच.डी. घोषित झालेल्या संशोधकांचे प्रबंध "शोधगंगा" या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

सर्व मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, मा. प्राचार्य / मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, आपल्या संशोधन केंद्रात पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे प्रबंध (Thesis) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार "शोधगंगा" या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांकडील संशोधन पूर्ण होऊन पीएच.डी. घोषित झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे "शोधगंगा" संकेतस्थळावरील https://shodhganga.inflibnet.ac.in/ या लिंक वर प्रबंध प्रसिद्ध झालेले नसतील, अशा संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनमधून Ph.D. Declaration व्यवस्थितरित्या pdf स्वरूपात अपलोड करावे. यानंतर "शोधगंगा" या संकेतस्थळावर प्रबंध प्रसिद्ध करण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करता येईल.

कृपया वरीलप्रमाणे कार्यवाही लवकरात-लवकर पूर्ण करावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
ईमेल : phdtracking_support@pun.unipune.ac.in
फोन : 020-71533633

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ : शै. प्रवेश/3788
दिनांक : 09/09/2023

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.